Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar


## Peer-Reviewed Indexed


## Multidisciplinary International Research Journal

**Match -2020**

**SPECIAL ISSUE**





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

**Aadhar Publications**

Scanned with OKEN Scanner

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308


# B.Aadhar


**Peer-Reviewed Indexed**


**Multidisciplinary International Research Journal**

## March-2020

**SPECIAL ISSUE-CCXXIV(224)**





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor :**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Scanned with OKEN Scanner

Impact Factor - 7.675 ISSN - 2278-9308

# B.Aadhar

## Multidisciplinary International Research Journal

**Peer-Reviewed Indexed**

**March - 2020**

**SPECIAL ISSUE – CCXXIV 224**

## Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr.Dinesh W.Nichit**
**Editor :**
**Principal**
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

**Aadhar International Publications**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher



Scanned with OKEN Scanner

# Editorial Board

**Chief Editor -**
**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**

**Executive-Editors -**

- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr. Jiro Akita** - Professor Of Economics Tohoku University. Japan
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro., Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,government College Of Education, Bhandara, Maharashtra
- **Dr. Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande,** Asstt. Professor Dr. P. D. College of Law, Amravati

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**

- **Prof.Virag Gawande Aadhar Publication Amravati 444604**

**Email :** aadharpublication@gmail.com**Website :** www.aadharsocial.com**Mobile : 9595560278**

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

## INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | अहिराणी भाषेतील साहित्य व संस्कृती संवर्धन | डॉ. रत्ना लाला जवरास | 1 |
| 2 | १९५६ च्या धर्मांतराचा समाजजीवनावर पडलेला प्रभाव | डॉ.बी.एच.किर्दक | 6 |
| 3 | पर्यावरण विषय प्रशिक्षणाचा उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांवरील परिणामांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास. | विनोद वाघमारे / डॉ. अमोल मांडेकर | 13 |
| 4 | ई—कच—याचे व्यवस्थापन | प्रा. डॉ.सुनिल एन. ढेरे. | 17 |
| 5 | वामनराव चोरघडे — एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 20 |
| 6 | दलित भारतीय कादंबरी : सामाजिक आणि सांस्कतिक अनुबंध | प्रा. डॉ.प्रभाकर रामचंद्र पवार | 25 |
| 7 | संतांची शिकवण काळाची गरज | प्रा.डॉ.उज्ज्वला पाटील | 33 |
| 8 | कविता—रती' या नियतकालिकातील कवितेतून प्रकटलेल्या महानगरीय जाणिवा | डॉ.श्रीकृष्ण पदमणे | 37 |
| 9 | डॉ. बाबासाहब अम्बेडकर का राजनैतिक एवं सामाजिक दर्शन भारत के सन्दर्भ में | प्रा. डॉ. यशवंत मेश्राम | 41 |
| 10 | "पश्चिम विदर्भातील एकुण ग्रामीण साक्षरता - एक भौगोलीक अभ्यास" | प्रा. डॉ. राहुल देविदास इंगळे | 45 |
| 11 | E- Governance मधील उपयोग | प्रा. डॉ. संजय उ. उल्हे | 51 |
| 12 | CHESS प्रशिक्षणाचा इंग्रजी शिक्षकांच्या अध्यापनावरील परिणामाचे सर्वेक्षणात्मक अध्ययन | पांडुरंग टिकाराम कोळवते / डॉ.अमोल मांडेकर | 54 |
| 13 | वस्त्र धुलाई कला : एक परिचय | प्रा.सौ.सुषमा सु. जाजु | 60 |
| 14 | भारतीय अर्थव्यवस्था अधोगतिच्या मार्गाने जाण्याची कारणे व उपाययोजना | डॉ. केशव सुर्यभानसा गुल्हाने | 64 |
| 15 | राष्ट्रसंवर्धनात ग्रामगितेचा आरोग्य मार्ग | प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख | 68 |
| 16 | बुध्द तत्वज्ञानाचा मराठी संत साहित्यावर प्रभाव | प्रा.डॉ. रजनी भिमराव गेडाम (सोनुले) | 71 |
| 17 | "उच्च प्राथमिक स्तरावर इतिहास अध्यापनात शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांची परिणामकारकता अभ्यासणे." | डॉ.हर्षानंद पं.खोब्रागडे | 74 |
| 18 | महर्षी धोंडो केशव कर्वे आणि स्त्री शिक्षणाची चळवळ | प्रा. डॉ. कविता तातेड | 77 |





Scanned with OKEN Scanner

ISSN : 2278-9308
March 2020

# वामनराव चोरघडे – एक दृष्टिक्षेप

प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय, मौदा, जि. नागपूर – ४४११०४

(भूमिका : विदर्भाला साहित्यिकांची परंपरा लाभलेली आहे. या साहित्य परंपरेमध्ये कथाकार वामनराव चोरघडे यांचे नाव कथाकार म्हणून साहित्यविश्वात परिचित असले तरी त्यांनी कथा, लोककथा, बालकथा, प्रबंध, चरित्र, आठवणी, अनुवाद, संपादित ग्रंथ अशा स्वरूपाची शंभरचे आसपास ग्रंथनिर्मिती केली. त्यांच्या साहित्यावर एक दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.)

**प्रस्तावना :**

अत्यंत गरीब परिस्थितीवर मात करीत शिक्षकीपेशापासून उपप्राचार्य म्हणून निवृत्त झालेले वामनराव चोरघडे यांचे विपुल साहित्य आहे. त्यांच्या साहित्यावर वैदर्भीय, ग्रामीण साहित्याची मूल्ये आहेत. बालपणी उशीरा शिक्षणाकडे वळलेले चोरघडे 'पुस्तक म्हणजे निर्जिव वस्तु नसतात' या भूमिकेतून त्यांच्या मनात वाचनाची आवड निर्माण होते. त्यांनी लिहिलेल्या साहित्यामुळेच त्यांना चंद्रपूर येथे भरलेल्या ५३ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मान मिळाला.

**बालपण :**

वामनराव चोरघडे यांचे वडील मध्यप्रदेशातील एका जमिनदाराकडे मुनिमाचे कार्य करीत होते. त्यांना मदारी गोंडाची पत्नी 'लखमी'ने अंगाखांद्यावर खेळविले. त्यांनी सर्व बालपण हे बहुजन समाजातील अठरापगड जातीमध्ये घालविले. स्वत:बद्दल सांगतांना ते म्हणतात की, 'माणसानी शिकविले, जनावरांनी शिकविले, पाखरांनी शिकविले, घरातील दारिद्र्यमुळे बाबर शिकला नव्हता पण आयुष्याच्या शाळेत त्याने खुप ज्ञान संपादन केले होते' याचप्रमाणे वामनराव चोरघडे यांनी आपले अनुभव विश्व त्यांच्या साहित्यातून व्यक्त केले.

**शिक्षण :**

बालपण त्यांनी नागपूर जिल्ह्यातील 'नरखेड' या खेड्यत घालविले. तिथेच वयाच्या ८ व्या वर्षापासून शिक्षणाला सुरुवात केली. प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक शिक्षणासाठी मामाकडे वर्धेला राहिले. तेथील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नागपूरच्या पटवर्धन हायस्कूल व पदव्युत्तर शिक्षण मॉरिस कॉलेजमध्ये पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना त्यांनी 'चेतना' हे हस्तलिखित काढले. पुढे जाऊन त्यांनी वाचक, लेखक, संपादक, प्रकाशक अशा भूमिका पार पाडल्या. त्यांनी शिक्षकाचा पेशा स्वीकारल्यानंतर जी.एस. कॉमर्स कॉलेज नागपूर येथे सेवानिवृत्तीपर्यंत कार्य केले.

**साहित्यसंपदा :**

वामनराव चोरघडे यांची विपुल ग्रंथसंपदा आहे. त्यांनी ११ लघुकथासंग्रह, १२ लोककथासंग्रह, ८ चरित्र ग्रंथ, १०–१२ अनुवादित साहित्य, १७ प्रबंध ग्रंथ लिहिले. मराठीतील या ग्रंथाबरोबर हिंदी, गुजराती, इंग्रजीमध्ये काही कथासंग्रहाचे अनुवाद प्रकाशित झाले. त्यांचे साहित्य वैचारिकता, तत्त्वज्ञान, लोकसाहित्य, समाजजीवन, वाङ्मयीन मूल्ये यांनी भरलेले आहे.

ग्रंथाच्या अर्पणपत्रिका दखलपात्र आहेत. त्यात 'सुषमा' हा कथासंग्रह 'झाडांच्या सावल्यांना' 'हवण' हा कथासंग्रह 'चराचराणा जठरेषु असणाऱ्या अग्निला', 'यौवण' हा कथासंग्रह 'गर्भवती धरित्रीला' अर्पण केला आहे.

**मराठीचा आदरभाव :**

वामनराव चोरघडे यांनी इंग्रजीचे महत्त्व मान्य केले होते. पण त्यांना मराठीचा सार्थ स्वाभिमान होता. भाषेबरोबर मानवाची संस्कृती असते. मातृभाषा म्हणजे आपली संस्कृती आहे असे त्यांना वाटते. आपल्या मातृभाषेला काया, वाचा, मनाने प्रतिष्ठा मिळावी म्हणून त्यांचा सतत पाठपुरावा करीत होते. त्यांनी ५३ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात, ''...... महाराष्ट्रातील विद्यापीठाच्या क्षेत्रातील सर्व विषयात मराठी माध्यम सुरू व्हावे'' अशी आशा व्यक्त केली. मराठी भाषेबद्दलची असणारी उदासिनता त्यांच्या लक्षात आली होती पण तो प्रश्न सोडविण्यासाठी कितीही मेहनत करावी लागली तरी ती करण्याची त्यांची तयारी होती हे त्यांनी सांगितले आहे. या भाषाप्रेमातून त्यांचा आपल्या संस्कृतीबद्दलचा आदरभाव व्यक्त होतो.

**कथाकार वामनराव चोरघडे :**

वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, वि. सी. गुर्जर, अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, दिवाकर कृष्ण, य. गो. जोशी हे त्यांचे समकालीन कथाकार आहेत या कथाकाराबरोबर चोरघडेंची कथा आपला नवा आकार घेवून वाटचाल करीत होती. त्यांची 'अम्मा' ही १ ली लघुकथा 'मुलांचे मासिक' मध्ये प्रकाशित झाली. 'सुषमा' हा १ ला कथासंग्रह १९३६ मध्ये प्रकाशित झाला. त्यांनी १६ कथासंग्रह, १२ लोककथासंग्रह, दोन कुमार कथासंग्रह अशा एकूण २८ कथासंग्रहापासून जवळपास ४०० कथा प्रकाशित आहेत.

हरिभाऊ आपटे, वि. सि. गुर्जर हे बोधप्रधान, रंजनप्रधान कथा लिहित होते. अरविंद गोखले, पु.भा. भावे, दि. बा. मोकाशी हे नवकथाकार म्हणून लेखन करीत होते. या काळात वामनराव चोरघडे यांची कथा शांत, सतत व दीर्घकाळ प्रवास करीत होती. त्यांचे कथालेखन हे दुसऱ्या कोणत्याही कथाकाराचे अनुकरण करणारे नाही. त्यांनी स्वत:च्या अनुभवाने सहजतेने लेखन केले. त्यामुळे त्यात उत्कटता आहे त्यांच्या कथा अंतर्मुख करणाऱ्या व काव्यात्मक आहेत. त्यांच्या कथा या गोष्टी रूपाने येतात त्या लांबलचक नसल्यामुळेच सुरुवात होत असतानाच समाप्त होते. त्यामुळे काहींना ती लघुकथा वाटते. त्यांची कथा ही ग्रामीण भागातील जीवन वाचकापुढे व्यक्त करते.

**ग्रामीण कथा :**

मराठीमध्ये ग्रामीण कथा समृद्ध करण्याचे कार्य व्यंकटेश माडगूळकरांनी केले तसेच श्री.म. माटे यांनी आपल्या कथासाहित्यातून 'उपेक्षितांचे अंतरंग उलघडवून दाखविले. वामनराव चोरघडे यांच्या कथामध्ये ग्रामीण जीवनाची वास्तविकता, दिलखुलासपणा आला आहे. ग्रामीण भागातील विविध घटकांचे प्रतिबिंब त्यांच्या कथेत असून संयम हा त्यांच्या कथेचा स्थायीभाव असल्याचे स्पष्ट होते. अतिथी देवो भव:, हादरा, हरीख, मानवाच्या दिशा, परिवर्तन, मातीची भांडी, आनंदग्रंथी यामधून लेखकाने ग्रामीण जीवन उभे केले आहे. याविषयी म. ना. अदवंत म्हणतात, ''.....खेड्यातील जीवनातील सौंदर्य, मांगल्य व संस्कार हे ज्याप्रमाणे त्यांनी कल्पकतेने टिपून घेतले आहेत. त्याचप्रमाणे त्या जीवनातील कारूण्यही त्यांना जाणवले आहे. त्यांच्या भोळ्या श्रद्धांशी ते समरस झाले आहेत. इतकेच नव्हे तर त्यांची भाषा त्यांनी आत्मसात केली आहे.


Scanned with OKEN Scanner

खेड्याचे अंतरंग असे अगदी आगळ्यारितीने जाणून घेणाऱ्या वामनरावांची कथा त्यामुळे विलक्षण समर्थ ठरते. त्या कथांमधील व्यक्तिही मनाची विलक्षण पकड घेतात.''[१]

वामनराव चोरघडे यांच्या कथा मुख्यत: 'प्रतिभा', 'जोस्ना' या नियतकालिकामधून प्रकाशित झाल्या. त्यांचा 'प्रेरणा' हा आत्मकथापर आठवणीवर आधारित कथासंग्रह आहे. त्यांच्या कथामध्ये परिचित व्यक्ती येतात किंवा कथेचा नायक स्वत: असतात. त्यामुळे कथा या प्रथमपुरूषी ठरतात. जीवनाच्या विविध क्षेत्रातील अनुभव कथावाङ्मयात त्यांनी मांडलेत. ''कथेशी एकनिष्ठ राहण्याचा मी प्रयत्न केला. मला असे वाटते की, एकच माध्यम प्रकटीकरणासाठी वापरणे बरे! पतिव्रतेच्या निष्ठेला पुण्य मिळाले! माझ्या दृष्टिने ते मला मिळाले.''[२] ही त्यांची सार्थ भूमिका आहे. वामनराव चोरघडे यांच्या कथाशैलीच्या संदर्भात वि. स. खांडेकर म्हणतात, ''कहाणीरूपाला अनुरूप अशीच आहे. छोटी छोटी पण अर्थपूर्ण वाक्ये, नाद व लय यांची लेणी जन्मत:च अंगावर घालून आलेली भाषा, निसर्ग व मनुष्य यांच्यातल्या सहसंवेदनेची जाणीव इत्यादिकांमुळे आपण त्यांची गोष्ट वाचीत नसून ती ऐकत आहो असे अनेकदा वाटते.''[३]

**बालवाङ्मय :**

'चंपाराणी' हे वामनराव चोरघडे यांचे बालवाङ्मयपर कथासंग्रह आहे. १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीमधील 'चले जाव' आंदोलनात सहभाग घेतला. त्यांनी तुरुंगवासही भोगला. कितीतरी देशभक्ताचे साहित्य अशा स्वातंत्र्य चळवळीदरम्यान जन्माला आले. याच प्रभावळीतील चोरघडे यांचे साहित्य आहे. 'चंपा'ची 'चंपाराणी' होण्यापर्यंतचा प्रवास या कथामध्ये आहे. यात मानवतावादी, आदर्श व करमणूकप्रधान कथा आहेत. 'प्रभावती'मध्ये पौष महिन्यातील पूजाअर्चा, शनिवारचे व्रत, सूर्याचा महिमा वर्णिला आहे. अबोली, भाग्यवती, कहाणी काऊची यातून लोककथा आलेल्या आहेत. 'देवाचे काम' यामध्ये आठ कथा आहेत. 'दानपसावो' या कथा संग्रहात ज्ञानदेव व ज्ञानदेवी या बालक मातेचे नाते सांगितले आहे.

**स्त्री विषयक भूमिका :**

वामनराव चोरघडे हे कुटुंबातील झालेल्या संस्कारामुळे स्त्री मनाकडे आदराने व विश्वासपूर्ण दृष्टीने पाहतात. स्त्रियाबद्दलची आपुलकी त्यातून व्यक्त होते. 'मुलीचे दिसणे पण ते दिसणे सबकुछ' असे त्यांना वाटत नाही त्या व्यतिरिक्तही स्त्रीचे जीवन आहे. त्याची दु:खे कथामधून येतात. दलित स्त्रियांच्या व्यथाचे चित्रण रेखाटतांना त्यांचे विविध कंगोरे त्यात येतात. 'संपूर्ण चोरघडे' मधील सखुला उदरनिर्वाहासाठी शील विकावे लागणेही अत्यंत लाजीरवाणी बाब आहे. अशा कथामधून त्यांच्या मनातील राग, चीड व्यक्त होते. तसेच 'ज्योतिर्मयी' मध्ये स्त्रीचे सामर्थ्य व्यक्त करतात. स्त्रियांची आई, बहिण अशी विविध नाती असून ती तन्मयतेने, नाजुकपणे व भाऊकपणे कथामध्ये येतात. 'विहीर या कथेत ''मातीच्या घागरी दोराने आत टाकून त्या पाणी ओढीत होत्या. बांधणीच्या गोट्यला लागून घागर केव्हा फुटेल याचा नेम नव्हता. फार जड होत्या त्या! घागर भरून आल्यावरच त्या इकडे तिकडे पाहात!'' यापद्धतीने स्त्रियांचे चारित्र्य कसे घागरीसारखे आहे व पुरुष कसे पितळेच्या भांड्यसारखे वागतात हे सांगितले.

**आत्मचरित्र :**

'जडणघडण', 'दर्शन', 'याद सताये' हे आत्मचरित्रात्मक ग्रंथ आहे. जन्मापासून तर १९... पर्यंतच्या आठवणींचा संग्रह 'जडणघडण' मध्ये आहे. पुढील १५ वर्षाचे जीवन 'दर्शन' व 'याद सतारे' यामधून आठवणीच्या रूपाने आहे. हे त्यांचे आत्मचरित्र नसले तरी आत्मचरित्रातील आठवणी यामध्ये असल्यामुळे सहजीवनातील सख्या—सोबतीचे संबंध, समाज व राजकारणात घालविलेले दिवस यामध्ये आहेत.

चरित्रग्रंथ :

रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांना चोरघडेंनी पाहिले नव्हते तसेच त्यांच्याबद्दलची माहितीही उपलब्ध नव्हती. परंतु सर्वोच्च न्यायालयातील दाव्यासंबंधातील ५६ लोकांच्या साक्षीचा यथोचित उपयोग करून 'धनयोगी' हे चरित्र त्यांनी लिहिले. लक्ष्मीनारायण यांनी नागपूर विद्यापीठाला आपली स्वकष्टार्जित संपत्ती ३५ लक्ष रुपये १९३० मध्ये दान दिली. गरिबीतून मात करीत श्रीमंत बनलेल्या या दानदात्याची नाळ वामनराव चोरघडेशी जुळली. कारण गरिबीचे चटके त्यांनीही सहन केले होते. 'देणे ईश्वराचे' हे अरविंदबाबू देशमुख यांचे चरित्रग्रंथ आहे. सज्जन, परोपकारी, सेवाव्रती अरविंदबाबुचे जीवन अंतर्बाह्य एकरूप आहे, त्यांच्या राजकीय, सामाजिक जीवनातील सहभाग यामध्ये नोंदविला आहे.

व्यक्तिचित्रे :

आचार्य काकासाहेब कालेलकर यांच्या जीवनदर्शनामधून त्यांच्या शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, राजकीय दृष्टिकोन १८—२० पानामधून घडविले. भारतीय संस्कृती, सेवा, तप, त्याग, तन—मन—धनाने देशसेवा, स्वातंत्र्यासाठी लढा, चारित्र्य, शिक्षण, वक्तृत्व, साहित्यसेवा या सानेगुरुजींच्या गुणांचा परिचय जीवनदर्शनातून घडते. बॅ. मोरेश्वर अभ्यंकर यांच्या श्रद्धांजलीपर गुणगौरवाद्वारे त्यांच्या वैयक्तिक जीवनापेक्षा राजकीय जीवनावरील कर्तृत्वाचा उलगडा केला आहे. तसेच विनोबा भावे, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, रा. कृ. पाटील, जमनालाल बजाज, वि. भि. कोलते यांची व्यक्तिचित्रे वाचतांना त्यांच्या गुणवैशिष्ट्यसह त्या काळाची सर्व माहितीही मिळते.

गांधीवाद :

वामनराव चोरघडे यांनी त्यांच्या साहित्यावरील गांधीवादाचा प्रभाव नाकारला. पण गांधीना अभिप्रेत असणारा संयम, सद्भाव, त्याग, विचारसरणी त्यांनी स्वीकारली होती त्यांचे राहणीमान साधे होते.

समाजजीवन :

स्वतःचे अनुभव वामनराव चोरघडेंनी लोककथांच्या माध्यमातून मांडले. त्या लोककथामधून काव्यात्मवृत्ती जोपासली. त्यांच्या कथांमधून गरीब, अज्ञान यांच्याबद्दलची सहानुभूती आहे. तसेच स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर समाजजीवन त्यांच्या साहित्यात आहे. त्यांच्या कथामध्ये संस्कार, सामाजिक आशय, काव्य, सरळ निवेदनशैली आहे. समाजातील सर्व घटकांचे जिवंत चित्रण यामध्ये आहे.

वामनराव चोरघडे यांच्या एकूण साहित्याचा चिकित्सक अभ्यास डॉ. ज्ञानेश्वर कळंबे यांनी केला असून त्यांनी अभ्यासातून सत्य वाचकासमोर आणले आहे.

निष्कर्ष :

१) कथा, लोककथा, चरित्र, आत्मचरित्र, व्यक्तिचित्रे असे सर्व प्रकारचे साहित्य आहे.

२) साहित्यामधून निसर्गातील सौंदर्य एखाद्या सुवासिनीसारखी जपली आहेत.

३) ग्रामीण जीवनातील बारकावे व्यक्त करतांना सुभाषितांचा वापर केला आहे पण कुठेही कृत्रिमपणा नाही.

४) साहित्य हे बोधप्रद, कथानक, करमणूक, मनोरंजन, वास्तववादी असे वैविध्यपूर्ण आहे.



Scanned with OKEN Scanner

संदर्भ टीपा :

१. (डॉ.) कळंबे ज्ञानेश्वर – ''वैदर्भीय साहित्यिक – वामनराव चोरघडे' – पृष्ठ क्र. ९०
२. (डॉ.) कळंबे ज्ञानेश्वर – ''वैदर्भीय साहित्यिक – वामनराव चोरघडे' – पृष्ठ क्र. ६८
३. डॉ. कळंबे ज्ञानेश्वर – ''वैदर्भीय साहित्यिक – वामनराव चोरघडे' – पृष्ठ क्र. ६८
४. (डॉ.) कळंबे ज्ञानेश्वर – 'वैदर्भिय 'वैदर्भीय साहित्यिक – वामनराव चोरघडे' – पृष्ठ क्र. १४८

संदर्भ ग्रंथ :–

१ (डॉ.) डी.एन. कळंबे – 'वैदर्भीय साहित्यिक – वामनराव चोरघडे'– हर्षवर्धन प्रकाश लिंबागणेश, जि. बीड (२०१७) कि. २००

Scanned with OKEN Scanner

तुमच्या Ph.D. प्रबंधाचे पुस्तकात रूपांतर करून मिळेल, व ते जगभर पोहोचेल...

More Details – 9595560278,




THESIS
DISSERTATION
PROJECT
CONVERT INTO BOOK


Scientific Journal Impact Factor

# CERTIFICATE OF INDEXING (SJIF 2020)

This certificate is awarded to

**Bahujan Aadhar**
**(ISSN: 2278-9308)**

The Journal has been positively evaluated in the SJIF Journals Master List evaluation process
SJIF 2020 = 7.675

**SJIF (A division of InnoSpace)**

SJIFactor Project Manager
International Advisory Services
INNOSPACE INTERNATIONAL

SJIFactor Project

Scanned with OKEN Scanner